CNR No. MHWR030057682017
**सं.फौ.ख.क्र. ४८११/२०१७**
**सरकार वि. बुध्दघोष**
**निशाणी क्र. ०४**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**
पिठासिन अधिकारी श्री. वि. प्र. खंदारे

## गुन्हयाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराधाचा दिनांक | : | ०६/१२/२०१६ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | ०६/१२/२०१६ |
| ३. | फिर्यादीचे नाव | : | सरकारतर्फे पो.स्टे. अधिकारी, पोलीस स्टेशन, वर्धा शहर, जि. वर्धा. |
| ४. | आरोपीचे नाव | : | बुध्दघोष दिलीप थुल, वय : २१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण, रा. गिरड, जि. वर्धा, ह.मु. हावरे ले–आउट, सेवाग्राम, ता. जि. वर्धा. |
| ५. | कायदयाचे नाव व कलम | : | भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७ व ३०४–अ आणि मोटर वाहन कायदाचे कलम ३(१) १८१, १८४, १४६/१९६ व १३०/१७७ प्रमाणे. |
| ६. | गुन्हयाचा तपशील | : | |

दिनांक ०६/१२/२०१६ रोजी दुपारी ०१:३० वाजताच्या सुमारास मिशन जनहित कार्यालय, भिमनगर, सावंगी मेघे, ता. जि. वर्धा येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील बजाज कंपनीची सीटी १०० मोटर सायकल क्र. एमएच ३२ एच. २३८३ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालविले. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत भारतीय दंड विधान कलम २७९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

द्वितीयत:

वर नमूद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन वर फिर्यादीचे वडीलांना धडक देवून दुखापत पोहचविली. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत भारतीय दंड विधान कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

तृतीयत:

वर नमूद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडील नथ्थुजी जानबाजी शंभरकर हे पायदळ रोड क्रॉस करत असतांना त्यांना धडक देवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरले. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत भारतीय दंड विधान कलम ३०४—अ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

चतुर्थत:

वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमचे ताब्यात वर नमुद वाहन विना परवाना चालवितांना आढळून आले. त्यामुळे तुम्ही माझ्या अख्त्यारीत मोटार वाहन कायदाचे कलम ३(१) चा भंग करून कलम १८१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

पंचमत:

वर नमूद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन रस्त्यावरील रहदारीची जाणिव असतांना निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालविले. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत मोटर वाहन कायदयाचे कलम १८४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

षष्ठत:

वर नमूद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन त्याच्या विम्याची मुदत संपली असल्याचे माहित असूनसुध्दा ते विना विमा चालविले. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत मोटर वाहन कायदयाचे कलम १४६ चा भंग करुन कलम १९६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

सप्तमत:

वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी तुम्ही तुमचे ताब्यात वर नमुद वाहनाचा परवाना पोलिसांनी मागितला असता तुम्ही तो त्यांना दिला नाही. त्यामुळे तुम्ही माझ्या अख्त्यारीत मोटार वाहन कायदाचे कलम १३० चा भंग करून कलम १७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

करीता तुमचेविरूध्द या न्यायालयात खटला चालविण्यात येतो.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.01.16 17:37:16 +0530

दिनांक : १६/०१/२०२६
ठिकाण : वर्धा

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)